# बालबोध जोडणी.

## प्रस्तावना आणि शुद्धविचार.

मराठी

हें पुस्तक

**मोरेश्वर काशिनाथ पाटणकर,**

अ० मा० शाळा चौलवाडी, मुंबई,

ह्यांनीं केलें.


म. ग्रं. सं. ठाणें

विषय
मिश्रकाल
२५८
संग्रहालय क्रमांक
६८

लेखक मो. का. पाटणकर

सन १८८९

पुस्तकाचें नांव बालबोध जोडी
शुद्धविचार

## या पुस्तकाविषयीं

रा० रा० विना[illegible] भिप्रायः—" बालबोध जोडाक्षरविचार [illegible] पुस्त-काचा हस्तलेख मीं समग्र वाचून पाहिला. तो मला आव-डला. हें पुस्तक, मुलांस जोडाक्षरें काढायास शिकविण्याच्या कामीं, शिक्षकांस फार उपयोगीं पडेल, आणि विषय चांगला समजून घेण्याचे कामीं मुलांस उपयोगीं पडेल, असें मला वाटतें. हें पुस्तक लहान मुलांच्या सोयीकरितां योजिलेलें आहे, ह्म-णून हें फार चांगलें ठळक, सुबक, आणि स्वच्छ छापलें पाहिजे; आणि किंमत बेताची पाहिजे. शिक्षणामध्यें ह्या पुस्तकाचा उ-पयोग व्हावा, अशी माझी इच्छा आहे." ता० १३ दिसेंबर सन १८८७.

रावसाहेब **गोविंद बळवंत लघाटे** डे. ए. इन्स्पेक्टर म-राठी स्कूल्स् मुंबई, यांचा अभिप्रायः—" **बालबोध जोडाक्षर-विचार** या नांवाचें पुस्तक मीं सगळें वाचून पाहिलें. पुस्तक चांगलें आहे. शिक्षकांस या पुस्तकापासून बराच फायदा होणार आहे. मुलांस शिक्षकाच्या साहाय्यावांचून या पुस्तकाचा उपयोग करितां यावयाचा नाहीं. थोड्या वेळांत मुलांस आरंभीं येणाऱ्या अडचणी या पुस्तकद्वारें दूर होतील असें वाटतें." ता० ५ नोव्हें-बर सन १८८७.

# बालबोध जोडाक्षर विचार.

## प्रस्तावना आणि परिभाषा.

मराठी दुसऱ्या इयत्तेंतील मुलांस जोडाक्षरें ल्याहावयास शिकविण्यास, आणि शिकण्यास फार कठीण पडतें, तें सोपें पडावें म्हणून हें पुस्तक केलें आहे. ह्यांत मराठी व तींत येणाऱ्या दुसऱ्या भाषेंतील जोडाक्षरें चालू बालबोध लिपींत लिहिण्याचे संबंधानें विचार केला आहे. तो लहान मुलांस सहज समजावा, व समजावून देतां यावा, म्हणून ह्या पुस्तकांतील भाषा आणि रचनाक्रमही करवेल तितका सोपा केला आहे. मागच्या अक्षरावर अनुस्वार असून तो न लिहितां, पुढील अक्षर त्याच्या वर्गातील अनुनासिकास जोडून लिहितात; तशीं जोडाक्षरें ह्यांत लिहिलीं नाहींत. ह्या पुस्तकांत मुख्यत्वें व्यंजनें एकमेकांस जोडावयाचा विचार आहे. व तीं स्पष्ट उच्चारितां येत नाहींत, म्हणून स्वरयुक्त लिहिलीं आहेत.

व्यंजनें लिहिण्याच्या रीति दोन आहेत; तें स्वतंत्र असतां एक, ( क्, ख्, ग्, ट्, प् इ० ) व त्यास दुसरें जोडावयाचें असतां एक ( क, ख, ग, ट, प इत्यादि ). तें दुसऱ्या रीतीनें ल्याहावयाचें असतां, पहिल्या रीतीपेक्षां कांहीं भाग कमी करून लिहितात. हा भेद लक्षांत यावा म्हणून त्यांस क्रमानें अक्षर आणि अर्धाक्षर अशी संज्ञा दिली आहे.

अक्षरांत ओळीस लागणारी लांब उभी रेघ ( ा ) असते, तीस काना असें म्हणतात. व तो ज्या अक्षरांत असतो, त्यास कान्याचें अक्षर असें म्हणतात. जसें;– क, ख, ग, त, प इत्यादि.

अक्षरांत ओळीस लागणारी लहानशी उभी रेघ ( ॱ ) असते, तीस शेंडी असें म्हणतात. व ती ज्या अक्षरांत असते, त्यास शेंडीचें अक्षर असें म्हणतात. जसें;– छ, ट, ल इत्यादि.

ज्या अक्षरांत काना व शेंडी दोन्ही असतात, त्यास कान्याचें अक्षर म्हणावें. जसें:– झ, श इत्यादि.

द अक्षरांतील ट ह्या शिवाय भागास गांठ (‿) असें म्हणतात.

अक्षरास अक्षर जोडणें म्हणजे अर्धाक्षराच्या पुढें, किंवा खालीं सगळें अक्षर लिहिणें. मग तीं एकमेकांस लागलेलीं असोत किंवा नसोत. जसें;- त्य, ग्य, ड्ड, ट्ट इत्यादि.

ह्या पुस्तकांतील दोष कोणत्याही शिक्षकानें सकारण कळविल्यास त्यांचा आभारपूर्वक स्वीकार करूं. व ते योग्य वाटल्यास पुढील आवृत्तींत दुरुस्त करण्याची तजवीज ठेवूं.

ह्या पुस्तकाच्या शेवटीं दिलेल्या सूचनेकडे शिक्षकांनीं अवश्य लक्ष द्यावें.

# अक्षरविचार.

मराठींत मूळाक्षरें ५२ आहेत. त्यांत स्वर १६, व्यंजनें ३४, आणि दोन जोडाक्षरें आहेत.

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः ह्यांस स्वर असें म्हणतात.

क, ख, ग, घ, ङ, च, छ, ज, झ, ञ, ट, ठ, ड, ढ, ण, त, थ, द, ध, न, प, फ, ब, भ+, म, य, र, ल, व, श+, ष, स, ह, ळ ह्यांस व्यंजनें असें म्हणतात. व्यंजनांत स्वर मिळविला म्हणजे अक्षर होतें. ऋ, ॠ, ऌ, ॡ, यांशिवाय बाकीचे स्वर व्यंजनांत मिळविले म्हणजे बाराखडी होते. तींत स्वरांच्या खुणा येतात त्या ह्याः-

बाराखडी- क, का, कि, की, कु, कू, के, कै, को, कौ, कं, कः.

स्वरांच्याखुणा- –, ा, ि, ी, ु, ू, े, ै, ो, ौ, ं, ः.

स्वर- अ, आ, इ, ई, उ#, ऊ, ए, ऐ, ओ, औ, अं*, अः*.

---

\+ भ आणखी भ असा, व श आणखी शं किंवा श असा लिहितात.

\# ह्या उकाराबद्दल ु अशी खूण कांहीं अक्षरांस जोडितात. जसें:-रु, रू इ०

* अं ह्यांतील (ं) ह्या खुणेस अनुस्वार असें म्हणतात, व अः ह्यांतील (ः) ह्या खुणेस विसर्ग असें म्हणतात. हे येथें अ स्वरास जोडून लिहिले आहेत,

व्यंजनास ऋस्वर जोडावयाचा असतां, त्याच्या खालीं ( ृ ) अशी खूण करितात. व तो रळा जोडावयाचा असतां ऋवर रेफ देतात. जसें;- कृ, गृ, पृ, दृ, हृ, ॠ इत्यादि.

व्यंजनें स्वररहित ल्याहावयाचीं असतां त्यांच्या खालीं ( ् ) अशी खूण करितात. जसें;- कदाचित्, किंचित्. (ह्या शब्दांतील व्यंजनांवरून त्यांच्या उच्चाराची कल्पना शिक्षकानें मुलांच्या मनांत भरवून द्यावी.)

क्ष आणि ज्ञ हीं जोडाक्षरें आहेत.

---

# जोडाक्षरविचार.

१. दोन किंवा अधिक अक्षरें जोडून लिहिलीं असतां त्यास जोडाक्षर असें म्हणतात. जसें;- त्य,

---

तसे दुसऱ्या स्वरांसही जोडितात. पण स्वराशिवाय एकटे कधींही येत नाहींत. अनुस्वार अक्षराच्या वर लिहितात, आणि विसर्ग अक्षराच्या पुढें लिहितात. जसें;- इंगळी, उंदीर, छिः, थुः इत्यादि.

अनुस्वाराचा उच्चार अनेक प्रकारचा होतो. जसें;- कंठी, किंमत, भिंत, तूं, लांकूड, कुंकूं इत्यादि.

त्म्य. ह्या दोहोंपैकीं पहिल्यांत त आणि य हीं दोन अक्षरें जोडून लिहिलीं आहेत; आणि दुसऱ्यांत त, म आणि य हीं तीन अक्षरें जोडून लिहिलीं आहेत.

२ – जेव्हां दोन अथवा अधिक अक्षरांचा उच्चार एकदम किंवा जोडून होतो, तेव्हां तें जोडाक्षर आहे असें समजावें. व तीं अक्षरें एकास एक जोडून ल्याहावीं. जसें;– सत्य ह्या शब्दांत त आणि य यांचा उच्चार एकदम झाला म्हणून तीं जोडून लिहिलीं आहेत.

३ – जोडाक्षरांत ज्यांचा उच्चार अगोदर होतो, तीं अक्षरें अर्धीं ल्याहावीं. आणि ज्याचा उच्चार शेवटीं होतो, तें अक्षर सगळें ल्याहावें. जसें;– त्य, त्म्य. ह्या दोन जोडाक्षरांपैकीं पहिल्यांत तचा उच्चार अगोदर झाला म्हणून तो अर्धा लिहिला; आणि यचा उच्चार शेवटीं झाला म्हणून तो सगळा लिहिला. तसेंच दुसऱ्यांत त, म हीं अक्षरें अर्धीं आणि य सगळा लिहिला आहे.

ह्यावरून असें समजावें कीं, दर जोडाक्षरांत

सगळें अक्षर एकच असतें, आणि अर्धें एक किंवा अनेक असतात.

४ – क पासून ळ पर्यंत अक्षरें अर्धीं लिहिण्याविषयीं सामान्य नियम:-

(१)- ज्या अक्षरांत काना असतो तीं* काना लिहिला नसतां अर्धीं होतात. जसें;- क, फ, ख, ग, प, झ, त हीं अक्षरें क्, फ्, ख्, ग्, प्, झ्, त् अशीं अर्धीं ल्याहावीं.

या शिवाय होणारीं कान्याचीं अर्धाक्षरें ९ व्या नियमांत त्या त्या अक्षरापुढें लिहिलीं आहेत.

(२)- द, ळ, ड, ह ह्यां शिवाय शेंडीचीं अक्षरें अर्धीं ल्याहावयाचीं असतां, जशींच्या तशींच लिहितात. आणि द गांठीशिवाय व ळ शेंडी शिवाय अर्धा होतो. जसें:- छ, ड, द, ळ हीं अक्षरें छ, ड,

---

* हीं शेंडीच्या अक्षराखालीं जोडून त्यांच्या पुढें दुसरें अक्षर जोडावयाचें असतां कधीं कधीं जशींच्या तशींच (८ ह्या खुणे शिवाय) जोडितात. जसें;- ह्म, ड्च, ड्य, ष्ट्य इत्यादि.

ट, ळ अशीं अर्धीं ल्याहावीं. आणि ठ, इ हीं अक्षरें ठ, इ अशीं अर्धीं ल्याहावीं.

५ – र शिवाय जोडाक्षरांत येणारीं सगळालीं अक्षरें जशींच्या तशींच लिहितात. जसें;– क, ह इत्यादि. (य केव्हां केव्हां च असा लिहितात. जसें;– ट्य. ह्य.

र जोडाक्षरांत सगळा आला असतां न, ऱ, आणि र असा तीन प्रकारांनीं जोडितात. त्यांत पहिला कान्याचे अर्धाक्षरास जोडितात. जसें;– क्र, ग्र, प्र इ०

दुसरा शेंडीच्या अर्धाक्षरास जोडितात. जसें;– ट्र, द्र इत्यादि.

तिसरा रला जोडावयाचा असतां मात्र जोडितात. जसें;– र्.

६ – जोडाक्षरांत अर्धें अक्षर अगोदर लिहून त्याच्या पुढें किंवा खालीं सगळें अक्षर जोडावें. जसें;– त्य, त्म्य, ङ्ग, क्क इत्यादि.

७ – अर्धाक्षरास दुसरें अर्धें किंवा सगळें अक्षर जोडण्याविषयीं नियमः–

(१)- ळ आणि कान्याचीं अर्धाक्षरें ह्यांस दुसरें अक्षर पुढें जोडितात. जसें;- ल्व, त्य, न्ह, म्र, स्र इ०

ऱ्, प्र ह्या अर्ध्या फळा आणि फळा दुसरें अक्षर क्र, क्रु, क्क, फ्र असें जोडितात. (असें जोडण्याचें कारण १७ व्या नियमांत सांगितलें आहे.)

(२)- य हा सर्व शेंडीच्या अक्षरांनां पुढें जोडितात, आणि म हा द ह आणि ङ ह्यांनां मात्र पुढें जोडितात. जसें:- ट्य, द्य, ह्य, द्म, ह्म, ङ्म इत्यादि.

(३)- शेंडीच्या अर्धाक्षरांस य शिवाय दुसरें अक्षर खालीं जोडितात. जसें;- ङ्ग, द्व, द्र, ङ्क इत्यादि.

अर्धाक्षरास पुढें किंवा खालीं जोडलेलें अक्षर ओळखण्याची साधारण खूण अशी आहे कीं, जेथें जोडलेलें अक्षर ओळीस लागलेलें असतें, तें पुढें जोडलेलें समजावें. आणि जोडलेलें अक्षर ओळीस लागलेलें नसतें, तें खालीं जोडलेलें समजावें.

८- जोडाक्षरांतल्या सगळ्या अक्षरास बाराखडींतल्या स्वरांच्या खुणा जोडल्या असतां, जो-

डाक्षरांच्या बाराखड्या होतात.

जेथें सगळें अक्षर पुढें जोडलेलें असतें तेथें त्या-सच स्वराच्या खुणा जोडितात. जसें;- त्य, त्या, त्यि, त्यी, त्यु, त्यू, त्ये, त्यै, त्यो, त्यौ, त्यं, त्यः

जेथें सगळें अक्षर खालीं जोडलेलें असतें, ते-थें स्वरांच्या कांहीं खुणा सगळ्या अक्षरास जोडिता-त. व कांहीं त्याच्या वरच्या अर्धाक्षरास जोडितात. जसें:- ह्द, ह्दा, ह्दि, ह्दी, ह्दु, ह्दू, ह्दे, ह्दै, ह्दो, ह्दौ, ह्दं, ह्दः.

९ — क पासून ळ पर्यंत अक्षरांपैकीं ञ खे-रीज दरएक अक्षर अर्धे लिहून त्यापुढें त्याला जोड-लेल्या अक्षरांचे शब्द लिहिले आहेत.

| अक्षर. | अर्धे अ०. | जोडलेलें अ० | जोडाक्षर. | शब्द. |
|---|---|---|---|---|
| क | क् | क | क्क | अक्कल, पक्क, चक्र, क्लेश. |
| | क् | य | क्य | वाक्य, आक्ट, आक्त, रुक्मिणी, लक्ष (क्ष* हा क आणि ष मिळून होतो.) |

---

* क्ष आणि ज्ञ हे मूळच्या रूपापासून कसे बदलले असावे, हें १७व्या निय-मांत दाखविलें आहे.

| अक्षर. | अर्धाक्षर. | जोड०अ०. | जोडाक्षर. | शब्द. |
| --- | --- | --- | --- | --- |
| क | क् | त | क्त | शक्त, चक्र. |
| | क्त् | य | क्त्य | युक्त्या. |
| ख | ख् | य | ख्य | सख्य, सख्खा, ख्रिस्ती. |
| ग | ग् | य | ग्य | योग्य, डग्गा, नग्न, उग्र, ग्लानि, ग्वाल्हेर. |
| घ | घ् | य | घ्य | वाघ्या, विघ्न, घ्राण, लघ्वी. |
| ङ | ङ् | म | ङ्म | वाङ्मन, वाङ्मन. |
| च | च् | य | च्य | वाच्यता, उच्च, इच्छा. |
| छ | च् छ | व | च्छ्व | श्वासोच्छ्वास, कृच्छ्र. |
| ज | ज् | य | ज्य | राज्य, मज्जा, वज्र, ज्वर, यज्ञ (ज्ञ+ हा ज आणि ञ मिळून होतो.) |
| झ | झ् | य | झ्य | झ्या. |
| ट | ट् | य | ट्य | गोट्या, हट्ट, ट्रामवे. |
| ठ | ठ् | य | ठ्य | काठ्या, लठ्ठ. |

+ मागच्या पानावरील * ही टीप पहा.

| अक्षर. | अर्धाक्षर. | जोड० अ० | जोडाक्षर. | शब्द. |
|---|---|---|---|---|
| ड | ड् | य | ड्य | जाड्य, खड्ग, गिड्डा, लाड्वास. |
| ढ | ढ् | य | ढ्य | दाढ्या, बुढ्ढा. |
| ण | ण् | य | ण्य | अरण्य, अण्णा, कण्व. |
| त | त् | य | त्य | तात्या, चमत्कार, रत्न, तत्पर, आत्मा, सत्व, उत्साह, चित्त. |
| | – | त | त्त | पित्त, यंत्र, शास्त्र. |
| थ | थ् | य | थ्य | पोथ्या, पृथ्वी. |
| द | द् | भ | द्भ | उद्भव, पद्म, शुद्ध, द्वेष, विद्या, हुद्दा, उद्गार, बुद्बळें, निद्रा. |
| ध | ध् | य | ध्य | संध्या, विध्वंस, ध्रुव. |
| न | न् | य | न्य | अन्य, अन्न, जन्म, अन्वय, पेन्सल, पुन्हा. |
| प | प् | य | प्य | प्याला, तप्त, स्वप्न, गप्पा, प्रतिपदा. |
| फ | फ् | र | फ्र | आफ्रिका. |
| | फ | य | फ्य | नफ्यास, लफ्फा. |

| अक्षर. | अर्धाक्षर. | जोड०अ० | जोडाक्षर. | शब्द. |
|---|---|---|---|---|
| ब | ब् | य | ब्य | तांब्या, शब्द, अब्ज, अब्रू, अब्धि. |
| भ | भ् | य | भ्य | सभ्य, शुभ्र. |
| भ | भ् | य | भ्य | सभ्य, शुभ्र. |
| म | म् | य | म्य | रम्य, महिम्न, अम्लता, नम्र, म्हैस. |
| य | य् | य | य्य | सहाय्य, अय्या. |
| र | र् | य | र्य | आर्य, तर्क, वर्ख, वर्ग, खर्च, मूर्छा, आर्जव, फर्डा, पूर्ण, वर्तणूक, अर्थ, गर्दी, अर्धा, सर्प, बर्फ, दुर्बल, गर्भ, कर्म, किर्र, बर्लीन, खर्व, फार्स, हर्ष, स्पर्श. |
| न | न् | य | न्य | सुऱ्या, कुऱ्हाड, ऱ्यंबक. |
| ल | ल् | य | ल्य | कल्याण, वल्कल, फाल्गुन, अल्प, गुल्म, किल्ला, बिल्व, जिल्हा. |

| अक्षर. | अर्धाक्षर. | जोड.अ. | जोडाक्षर. | शब्द. |
|---|---|---|---|---|
| व | व् | य | व्य | व्यय, व्रत, नव्वद, तेव्हां. |
| श | श् | य | श्य | अवश्य, अश्मरी, दुश्श, विश्व. |
| श | श् | य | श्य | अवश्य, श्मशान, शाश्वत. |
| श | श् | च | श्च | निश्चय, प्रश्न, आश्रय, श्लोक, अश्व. |
| ष | ष् | य | ष्य | मनुष्य, पुष्कळ, नष्ट, पृष्ठ, उष्णा, पुष्प, उष्मा, पुष्य. |
| स | स् | य | स्य | दास्य, तस्कर, स्टेशन, सुस्त, स्वस्थ, स्नान, परस्पर, स्फुरण, स्मरण, स्राव, स्लेट, हिस्सा, अस्खलित. |
| ह | ह् | य | ह्य | ह्यानें, ब्राह्मण, चिह्न, ह्रस्व, आह्लाद, जिह्वा. |
| ळ | ळ् | य | ळ्य | टाळ्या. |

१०– ऱ्‍ आणि = ह्या दोन अर्ध्या रपैकीं पहिल्यास रेफ असें म्हणतात. हा जोडाक्षरांत पूर्वी

येतो, आणि तो ओळीवर लिहितात. व दुसरा पूर्वी किंवा मध्यें येतो, आणि तो ओळीखालीं लिहितात. जसें;- र्य, ऱ्य, ऱ्य.

जोडाक्षरांत रेफ पूर्वी येतो, तेव्हां तें जोडाक्षर उच्चारितांना रेफापेक्षां सगळ्या अक्षरावर जोर येतो. व दुसरा अर्धा र पूर्वी येतो, तेव्हां सगळ्या अक्षरापेक्षां, अर्ध्या रवर जोर येतो. जसें;- आर्या, दोऱ्या, गऱ्हीं, तऱ्हा इत्यादि.

११- जोडाक्षरांत रेफ सगळ्या अक्षरावर लिहितात. व तें सगळें अक्षर खालीं जोडलें असतां, त्याच्या वरील अर्धाक्षरावर लिहितात. आणि बाराखडींत पुढें काना आला असतां त्या कान्यावर लिहितात. जसें;- र्क्के, र्द्ध, र्व्य, र्द्य; र्का, र्की, र्को, र्कं, र्द्दी, र्व्या इ०.

१२- श्, श्, आणि ॱ ह्या तीन अर्धशाकारांपैकीं-

पुढें श जोडाक्षराचा असतां पहिला लिहितात. जसें;- श्श.

पुणे

पुढें म, य जोडावयाचे असतां पहिल्या दोहों-पैकीं कोणता तरी एक येतो. जसें;- श्य, श्म; श्य, श्म.

पुढें च, न, र, ल जोडावयाचे असतां तिसरा ये-तो. जसें;- श्च, श्न, श्र, श्ल.

पुढें व जोडावयाचा असतां तिहीं पैकीं कोण-ता तरी एक येतो. जसें;- श्व, श्व, श्व.

**१३** - एकच अक्षर फार जोर देऊन उच्चारिलें असतां, त्या जातीचीं दोन अक्षरें एकास एक जोडून लिहितात, त्यास द्वित्त जोडाक्षर असें म्हणतात. जसें; क्क, ख्ख, ग्ग इत्यादि.

**१४** - जोडाक्षर उच्चारण्याचे नियमः-

(१) - जीं अक्षरें एकापुढें एक जोडलेलीं अस-तात, तीं डाव्या हाताकडून क्रमानें उच्चारून नंतर त्या-च्या खालीं व पुढें अक्षरें असल्यास तीं उच्चारावीं. ज-सें;- त्क, त्क्र, त्म्य, ष्ट्र, ष्ट्र्य इत्यादि.

(२) - जीं अक्षरें एकाखालीं एक जोडलेलीं असतात, तीं वरपासून क्रमानें उच्चारून मग त्याच्या

पुढें अक्षरें असल्यास तीं उच्चारावीं. जसें;- ड्र, द्र, द्य, द्ध इत्यादि.

(३) - रेफ पहिल्यानें उच्चारून नंतर दुसरीं अक्षरें उच्चारावीं. जसें;- र्म, र्म्य, र्द, र्ध्व इत्यादि.

१५ - चिन्ह, ऱ्हस्व, जिव्हा, आल्हाद, ब्राम्हण वगैरे "संस्कृत" शब्दांतील हकारयुक्त जोडाक्षरांच्या उच्चारांत बदल झाल्यामुळें लिहिण्यांतही बदल झाला आहे. हीं मूळचीं (संस्कृतांत) चिह्न, ह्रस्व, जिह्वा, आह्लाद, ब्राह्मण अशीं आहेत. ह्यांत ह अर्धा असून त्यास जोडलेलीं अक्षरें सगळीं आहेत, म्हणून त्यांचा उच्चारही तसाच झाला पाहिजे. पण हल्लीं सगळ्या अक्षराचा उच्चार अर्धाक्षराप्रमाणें आणि अर्ध्या हचा उच्चार सगळ्या अक्षराप्रमाणें करितात व त्याप्रमाणेंच लिहितात. (परंतु हीं मूळच्या प्रमाणें त्याज्ञावीं व उच्चारावीं हें बरें, किंवा हे शब्द मराठी आहेत असें म्हणावें हें बरें.)

१६ - कित्येक जोडाक्षरें उच्चाराप्रमाणें लिहीत

नाहींत. जसें;- ह्मैस, ह्मणतो, मुद्यावर, किल्यावर. ह्यां त पहिल्या दोहोंत मचा उच्चार पूर्वी होतो म्हणून ते म्हैस, म्हणतो असे ल्याहावे. आणि पुढच्या दोहोंतील जोडाक्षरांचीं अर्धाक्षरें द्वित्त पाहिजेत, म्हणजे ते मुद्द्यावर, किल्ल्यावर असे पाहिजेत. ज्ञ हा द, न आणि य मिळून उच्चारितात, आणि ज, ञ मिळून लिहितात. तसेंच उत्साह, औत्सुक्य, बुध्दि, स्छावर वगैरे.

१७ – कित्येक जोडाक्षरें लिहिण्याच्या रीतींत बदल झाला आहे त्याचीं कारणें:-

(१)- ल्याहावयास सुलभ पडावें. जसें:- क्ष, ञ, ह्रु हीं जोडाक्षरें क्ष (क्ष, क्ष, क्ष, क्ष, क्ष.), ज्ञ (ज्ञ, ज्ञ, ज्ञ, ज्ञ, ज्ञ.), हु अशीं लिहितात.

(२)- जागा थोडी पुरावी. जसें:-ष्ट, प्त, प्न, क्च, ग्ल हीं जोडाक्षरें ष्ट, प्त, प्न, क्च, ग्ल अशीं लिहितात.

(३)- सारखेपणामुळें ओळखण्यास भ्रांति पडूं नये. जसें:- ड्ड, द्य, ट्ट हीं जोडाक्षरें, अर्धा ट आणि अर्धा द हीं सारखींच आहेत त्यां पैकीं दला जोडले-

तीं अक्षरें सहज समजावीं म्हणून द्ध, द्य, द्द अशीं लिहितात.

त, र ह्या दोहोंच्या अर्धांचा भेद, त - असा आणि र - असा लिहून स्पष्ट करितात. जसें:- त्र ऱ्ह हीं जोडाक्षरें त्र ऱ्ह अशीं लिहितात.

१८ – ज्यांचा उच्चार बरोबर आहे, तीं जोडाक्षरें जशीं लिहिण्याची वहिवाट असेल तशींच ल्याहावीं. त्यांत मुलांनीं आपल्या कल्पनेनें फेरफार करूं नये. जसें;- क्ट, द्य, क्य, स्न, यां हीं जोडाक्षरें कृ, ट्य, क्य, रू, यी अशीं किंवा अन्य रीतीनें न लिहितां चालू रीतीप्रमाणेंच ल्याहावीं.

१९ – कांहीं जोडाक्षरें दोन प्रकारांनीं लिहिण्याची वहिवाट आहे, त्यांपैकीं कोणतें तरी एक ल्याहावें. जसें;- क्त, क्त; श्च, श्व; क्र, क्र; ङ्ग, ङ्ग; त्र, त्र; त्का, त्का इत्यादि.

२० – जोडाक्षरांतलें पहिलें अक्षर केव्हां केव्हां अर्धें न लिहितां, सगळें आणि स्वतंत्र लिहिता-

त; तसें लिहूं नये. कारण, लिहिण्यास वेळ आणि जागा थोडी लागणें, हा जो अक्षरें जोडण्याचा उद्देश, तो तसें लिहिण्यानें साधत नाहीं. जसें;- सद्‌गुण, वाङ्‌मन, फ्रांक्‌लिन, पद्‌भ्यां इत्यादि शब्द सद्गुण, वाङ्मन, फ्रांक्लिन, पद्भ्यां असे ल्याहावे.

२१- ऋकारयुक्त किंवा विसर्गयुक्त अक्षर उच्चारण्यास कठीण पडतें, म्हणून तें जोडाक्षर आहे असा मुलांस भास होतो; परंतु तें जोडाक्षर नाहीं. कारण ह्यांत एकच अक्षर असतें आणि जोडाक्षरांत एकाहून जास्ती अक्षरें असतात. जसें;- कृ, पृ, दृ हीं ऋकारयुक्त अक्षरें आहेत, जोडाक्षरें नाहींत. आणि क्रृ, स्पृ, द्रृ हीं ऋकारयुक्त जोडाक्षरें आहेत.

---

## वाचना करितां जोडाक्षरांचे शब्द.

ज्यांत दोन अक्षरें आहेत, अशा जोडाक्षरांचे शब्द - ऐक्य, धक्का, पक्की, शुक्रवार, भक्ति, रक्त, -

अग्नि, लग्न, ग्रहण, गच्ची, कच्छ, कज्जा, ज्वारी, ज्ञान, तट्ट, गठ्ठा, फूत्कार, यत्न, महत्व, छत्री, उत्तर, इयत्ता, स्थिर, स्थान, बुद्धि, युद्ध, विद्वान, द्वितीया, गाद्या, सुद्दाम, द्रोण, पन्नास, सन्मान, जप्ती, धिप्पाड, प्रीति, भ्रम, म्हण, विसर्ग, कर्ज, सवय्या, वर्ण, कर्ता, पदार्थ, धर्म, सूर्य, गर्व, वर्ष, दोऱ्या, बिऱ्हाड, चांचल्य, वल्गना, कल्पना, कोल्हा, कल्हई, आश्विन, ईश्वर, पश्चिम, आश्लेषा, श्रीमंत, दुष्काळ, चष्मा, भास्कर, पुस्ती, वस्तु, भस्म, चह्या, सद्गुण, उन्हाळा, इंग्रज, हिंदुस्थान, कार्तिक, श्रावण, हल्ली, सल्ले, विष्णु.

## ज्यांत तीन अक्षरें आहेत, अशा जोडाक्षरांचे शब्द.

लक्ष्मी, तीक्ष्ण, लक्ष्य, वस्त्र, स्त्री, छत्र्या, मेणबत्त्या, पुस्त्या, मत्स्य, पक्ष्या, सामर्थ्य, दारिद्र्य, दयार्द्र, रस्त्यांत, आत्म्यास, सात्म्य, कच्च्या, लठ्ठ्या, हत्त्यानें, मत्स्यानें, सूक्ष्म, महाराष्ट्र, बुद्ध्या, नीतिदृष्ट्या, नान्ह्या, जिल्ह्यांत, सद्व्यय.

# दोन जोडाक्षरांचे शब्द.

ब्रह्मदेव, ग्राम्य, स्वर्ग, प्रश्न, स्वस्थ, स्पष्ट, स्वतंत्र, शुक्लपक्ष, स्वार्थ, प्रत्येकास, व्याख्या, स्वादिष्ट, व्यर्थ, विद्यार्थी, ब्रात्य, प्रसिद्ध, तात्पर्य, श्राद्ध, उत्पत्ति, प्रतिष्ठा, दुष्कर्म, स्वधर्म, व्यग्र, श्रेष्ठ, इष्टमित्र, गर्विष्ट, व्यक्त, उन्मत्त, विद्वत्ता, नक्षत्र, मार्गशीर्ष, दुश्चिन्ह, प्रार्थना, सर्वत्र, कल्पवृक्ष, मर्मज्ञ, ऐश्वर्य, प्रतिवर्षी, कर्तव्य, पक्वान्न, प्रारब्ध, ज्येष्ठ, औत्सुक्य, उत्कृष्ट, स्वास्थ्य, ग्राह्य, प्रविष्ट, निर्लज्ज, भ्रष्ट, आत्मनिष्ठ, मार्गस्थ, व्यत्यय, प्रत्यवाय, मित्रत्व, द्रव्य, श्मश्रु, लज्जास्पद, प्रत्युत्तर, ग्रीष्म.

## वाक्यें.

ईश्वर प्राणीमात्रास आपल्या निर्वाहापुरतें ज्ञान देतो. मुलांनीं विद्येकडे लक्ष द्यावें आणि शिक्षकाच्या आज्ञा पाळाव्या, ह्यांत त्यांचें कल्याण आहे. शत्रूच्या भयास्तव इंग्लिशांनीं कलकत्त्यास किल्ला बांधिला. प्रयत्न केल्यास फलप्राप्ति होईलच.

परमेश्वरानें मनुष्याकरितां तऱ्हेतऱ्हेच्या वनस्पति व वस्तु उत्पन्न केल्या. धर्मभ्रष्ट केलेल्यास ब्राह्मण प्रायश्चित्तानें शुद्ध करितात. इंद्रानें पृथ्वी प्रदक्षिणा केली. हरिश्चंद्रानें स्वप्नांत विश्वामित्रास सर्व राज्य दिलें. एखाद्या क्षेत्रीं मनस्वी यात्रा जमते; तेथें स्वच्छतेची अव्यवस्था असल्यामुळें पुष्कळ रोग उत्पन्न होतात. रोगग्रस्त मनुष्यानें उत्तम वैद्यापासून व्याधिनाशक व शक्तिवर्धक औषध घ्यावें. कृष्णाशास्त्री लक्ष्मणशास्त्र्यापेक्षां विद्वान आहेत.

## ऋकारयुक्त व विसर्गयुक्त अक्षरांचे आणि जोडाक्षरांचे शब्द.

कृपा, गृह, वृषभ, घृत, सद्गृहस्थ, पृष्ठ, मृत्यु, दृष्टि, तृप्ति, तृषा, नृपति, नृत्य, शृंग, वृथा, नैर्ऋत्य, अतःपर, छिः, अंतःकरण, कःपदार्थ, चतुःसीमा, स्वतः, प्रथमतः, यःकश्चित्, प्रातःकाळ, बृहस्पति, कर्तव्यः.

शिक्षकांस सूचनाः- हें पुस्तक शिकवितांना, नुसत्या उच्चारावरून जोडाक्षरांचे अवयव मुलांस समजून तीं लिहितां येतील, ह्याकडे विशेष लक्ष द्यावें. जोडाक्षरांचे शब्द पाठ करून घेणें किंवा त्यांचा अर्थ समजावून देणें ह्या भरीस पडूं नये. कारण ह्या पुस्तकांत जे जोडाक्षरांचे शब्द दिले आहेत, ते मुलांस केवळ जोडाक्षरांचें ज्ञान होण्याकरितांच आहेत.

# पोतदारांची नीतिपर व मनोरंजक पुस्तकमाला.

सामान्यतः दिवसेंदिवस वाचन व लेखन यांची अभिरुचि वाढत चालली आहे. तथापि नीतिपर असून मनोरंजक अशा पुस्तकांचा आपल्या महाराष्ट्रभाषेंत असावा तितका संग्रह झालेला नाहीं. ह्मणून आह्मीं विद्वान् गृहस्थांकडून संस्कृत नाटकांचा व काव्यांचा आधार धरून खालीं लिहिलेलीं पुस्तकें तयार केलीं आहेत.

१ **करुणराघव**—हें संस्कृत उत्तररामचरिताच्या आधारानें मराठींत कादंबरीसारखें लिहिलें आहे. किं. १ रुपया. ट. ख. २ आणे.

२ **ललितवत्सराज** ( पूर्वार्ध. )— हें संस्कृत रत्नावलि नाटिकेच्या आधारानें सदर प्रमाणें लिहिलें आहे. किंमत ८आणे.ट.ख.१ आणा.

३ **ललितवत्सराज**( उत्तरार्ध. )— हें संस्कृत प्रियदर्शिका नाटिकेच्या आधारानें सदर प्रमाणें लिहिलें आहे. किंमत ८ आ.ट.ख.१ आणा.

४ **चारुदत्त आणि वसंतसेना**—हें संस्कृत मृच्छकटिकाच्या आधारानें मराठींत कादंबरीसारखें लिहिलें आहे. किंमत१रुपया.ट.ख.१ आणा.

५ **प्रणयिमाधव**— हें संस्कृत मालतिमाधवाचे आधारानें सदरप्रमाणें मराठींत लिहिलें आहे. किं. १ रुपया. ट. ख. १ आणा.

६ **आर्यचाणक्य**—हें संस्कृत मुद्राराक्षस नाटकाच्या आधारानें मराठींत गोष्टीच्या रूपानें लिहिलें आहे. यांत राजकीय मसलती समजून घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांस विशेष आनंद होईल. किं.१ रु.ट.ख.१ आणा.

७ **विदग्धपुरूरवा**—हें संस्कृत विक्रमोर्वशीच्या आधारानें सदर प्रमाणें लिहिलें आहे. किंमत १४ आणे. ट. ख. १ आणा.

८ **राजा अग्निमित्र**— हें संस्कृत मालविकाग्निमित्र नाटकाच्या आधारानें मराठींत लिहिलें आहे. किंमत १ रु. ट. ख. १ आणा.

**वासुदेव मोरेश्वर पोतदार, कांदेवाडी, मुंबई,**

# पुस्तकें विक्रीस तयार.

| पुस्तकांचीं नांवें. | रु. | आ. |
|---|---|---|
| जर्मन भाषेंतील सुरस गोष्टी भाग १. ...... | ० | ...१४ |
| जर्मन भाषेंतील सुरस गोष्टी भाग २ ...... | १ | ... २ |
| सुशिक्षितस्त्री. ...... .. | ० | ...१० |
| सुंदरी आणि वसंतसेन भाग १............ | ० | ... ४ |
| सुंदरी आणि वसंतसेन भाग २ ............ | ० | ... ६ |
| सुंदरी आणि वसंतसेन भाग ३ रा........ | ० | ...१० |
| शिवदिग्विजय अथवा तरुणशिवाजीनाटक. | १ | ... ० |
| बृहत्कथासागर भाग १... | २ | ... ४ |
| यशवंत विजया नाटिका | ० | ... ४ |
| सुंदराबाई ( एक चटकदार गोष्ट. ) ...... | ० | ... १ |
| चातुर्य रत्नावली भाग १।२ ३।४ दर भागास.... | ० | ... ·।।· |
| विचारमाला ( उपदेशपरवाक्यें) | | ·।।· |
| **शिवलीलामृत**, पदच्छेद करून शुद्ध केलेली पोथी | ० | ...१२ |
| **आरतीसंग्रह** ( आरतीसंख्या ३१० )...... | ० | ...१२ |
| **भूपाळ्यासंग्रह** ( भूपाळयासंख्या ८६ ) | ० | ... ३ |
| **बालहितोपदेशिका** सुधारलेली दुसरी आवृत्ति | ० | ...३।। |
| **शब्दरुपावलि** अव्यय व समासविचार एकत्र | ० | ... ३ |
| **शनिमाहात्म्य** सांचा मोठा व जाड टाईप...... | ० | ...२।। |
| **एकादशीमाहात्म्य** सुधारलेलें. ............ | ० | ... २ |
| सत्यनारायण कथा प्राकृत ओंवीबद्ध शुद्ध केलेली. | ० | ... २ |
| लेखनदीपिका ( म. शुद्ध लिहिण्याचे सोपे नियम) | ० | ... १ |
| व्याकरणबोध. ...... | ० | ... २ |
| मराठी शब्दरूपावलि व धातुरूपावलि. ...... | ० | ...१।। |
| सुबोध व्याकरण...... | ० | ... ४ |